# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शहापूर (जि.ठाणे) येथील आश्रमशाळांची अवस्था दयनीय असल्याबाबत

**(१) ५७३८ (१०-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील ९० टक्के आश्रमशाळांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बकाल झालेल्या आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळांकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचेही आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी विकासाच्या आश्रमशाळेची अवस्था सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

शहापूर प्रकल्पांचे कार्यक्षेत्रातील एकूण २० आश्रमशाळेच्या इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यापैकी १३ आश्रमशाळांची बांधकामे सुरु असून त्यांना वेळोवेळी निधी वितरीत केला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना खरेदी करता येत नसल्याबाबत

**(२) ६१०१ (१०-०४-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड**

**(कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव व जुन्नर उपविभागात आदिवासींची जमीन घेतलेले ८० बिगर खातेदार असल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना खरेदी करता येत नसल्याने सदर बिगर आदिवासींनी खरेदी केलेल्या जमिनी मूळ आदिवासींना परत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती आदिवासी लोकांना त्यांच्या जमिनी परत करण्यात आल्या आहेत, व उर्वरित आदिवासी लोकांच्या जमिनी केव्हा परत करण्यात येतील,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०१-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ अ च्या पोटकलम (४) व (५) तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ मधील जिल्हाधिकारी यांचे अधिकार जिल्हाधिकारी, पुणे यांनी संबंधित उपविभागीय अधिका-यांना त्यांच्या कार्यक्षेत्राकरीता प्रत्योयोजित केले आहेत. त्यानुषंगाने माहे एप्रिल, २०१५ अखेर जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील एकूण ४१ प्रकरणी ३७.२९ हे आर क्षेत्र मुळ आदिवासी खातेदारांना परत करण्यात आले असून उर्वरित प्रकरणी नियमानुसार उचित कार्यवाही सुरु आहे.

(४) सदरचे काम अर्ध-न्यायीक स्वरुपाचे असल्याने प्रकरण निर्गत होण्यास काही कालावधी लागत आहे.

---

## कर्जत व मुरबाड तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेत मुलांना सोयीसुविधा मिळत नसल्याबाबत

**(३) ११४०६ (१०-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) व मुरबाड (जि.ठाणे) या तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या मुलांना सोयीसुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत आश्रमशाळेची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार तालुक्यातील आदिवासी शाळेत सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड येथे बोगस आदिवासी प्रमाणपत्रे देण्यात आल्याबाबत**

**(४) १७४६२ (३१-०७-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील आदिवासी आणि डोंगराळ किनवट तालुकयात आदिवासींची मोठी संख्या असली तरी अलीकडे येथे बोगस आदिवासींचा उपद्रव वाढला असल्याने हे बोगस आदिवासी भ्रष्टाचारी मार्गाने आदिवासी जात प्रमाणपत्र मिळवून मूळ आदिवासींचे हक्क हिरावून घेत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००३ ते २०१५ या काळात प्रभारी एस.डी.ओ किनवट, तहसिलदार किनवट, जि.नांदेड यांनी ७० बोगस आदिवासींचे दाखले गैर आदिवासींना निर्गमित करुन प्रती बोगस दाखल्यामागे १.५ लक्ष रुपयाप्रमाणे १ कोटी ५ लक्ष रुपयांचा गैरव्यवहार केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैर आदिवासींना आदिवासींचे प्रमाणपत्र देणारे एसडीओ व तहसिलदार किनवट यांना निलंबित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, आर्णी यांनी मा.महसूल मंत्र्यांना दि.२६.३.२०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०१-२०१७) :** (१) व (२) उप विभागीय अधिकारी, किनवट हे पद बदलीने रिक्त झालेल्या कालावधीत या पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आलेल्या तहसिलदार, किनवट यांनी पुर्वी फेटाळण्यात आलेल्या ०८ प्रकरणांमध्ये प्रमाणपत्र दिल्याचे चौकशीत आढळून आले आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी संबंधीत तहसिलदार तथा प्रभारी उप विभागीय अधिकारी, किनवट यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली असून अन्य दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक आदिवासी आयुक्तालयातील सरकारी अधिकारी व आदिवासी बांधवांना शिवीगाळ करत असल्याबाबत**

**(५) २२२९४ (३१-०७-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक आदिवासी आयुक्तालयातील आदिवासी जात पडताळणी करणारा सरकारी अधिकारीच आदिवासी बांधवांना शिवीगाळ करत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील कर्मचाऱ्याविरोधात जाणीवपूर्वक जात प्रमाणपत्र दिले जात नसल्याने मा.मुख्यमंत्र्याकडे, पोलिसांकडे आणि न्यायालयाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने राज्यातील जात पडताळणी समितीच्या कारभारावर आक्षेप करुनही अशा प्रकारे हुकूमशाही करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषी आढ्ळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०१-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) मा. उच्च न्यायालयाचे निर्णयात अशा स्वरुपाचे आक्षेप नोंदविण्यात आलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात शिष्यवृत्ती गैरव्यवहाराची विशष पथकामार्फत चौकशी करणेबाबत**

**(६) २५३६१ (०६-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात निदर्शनास आलेल्या शिष्यवृत्ती गैरव्यवहाराची चौकशी विशेष पथकामार्फत पुर्ण केलीआहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बुलढाणा जिल्ह्यातील शिष्यवृत्ती गैरव्यवहाराबाबत दोषींविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६) :** (१) आदिवासी विकास विभाग तसेच सामाजिक न्याय विभाग यांच्यामार्फत देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपामधील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शिष्यवृत्ती गैरव्यवहारांची चौकशी करण्याकरीता गृह विभागाच्या दि.१५.०१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर पोलिस महासंचालक (प्रशिक्षण), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीमार्फत चौकशी सुरु असून अंतीम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी रमाई घरकुल योजना राबविण्याबाबत**

**(७) २८१६८ (३१-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी रमाई घरकुल योजना राबविली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे सदर योजनेत घरकुल बांधण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांकडे जागेच्या मालकीबाबत ७/१२ व पी.आर.कार्ड नसल्यामुळे घरे बांधून देण्यास परवानगी नाकारली जाते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पूर्वीच्या घरकुल योजनेप्रमाणे दिनांक १ जानेवारी, १९९४ पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या लाभार्थ्यांना शासन निर्णयात सुधारणा करुन घरकुल बांधण्यास परवानगी देणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त भाग (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७) :** (१) होय.
(२), (३) व (४) शासन निर्णय क्र. विसआ-२०१५/प्र.क्र.८५/ बांधकामे, दि. १५/३/२०१६ अन्वये दिनांक १/१/१९९५ या दिनांकास राज्य शासन महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, एमएमआरडीए, शासनाचे उपक्रम यांच्या जमिनीवर अतिक्रमण करुन त्या ठिकाणी राहत असलेले व दिनांक १/१/१९९५ रोजी त्यांचे घरकुल/निवासस्थान सदर जमिनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेले असल्यास, अशा लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेची अमंलबजावणी करणेबाबतच्या शासन निर्णय क्र. बीसीएच २००९/ प्रक्र. १५९/मावक-२, दिनांक ९/३/२०१० अन्वये विहित केलेली ७/१२ चा उतारा सादर करण्याची अट शिथील करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतकऱ्याऐवजी इतरांना निम्म्या कृषी कर्जाचे वाटप करण्यात आल्याबाबत

**(८) २८२८१ (१५-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकूण कृषी कर्जापैकी ४४ टक्के कर्जे ही बँकाच्या शहरामधील शाखांनी दिली असून, ग्रामीण भागातील बँक शाखांनी दिलेल्या कर्जाचे प्रमाण ३० टक्के होते, असे रिझर्व्ह बँकेने बेसिक स्टॅटिस्टिकल रिटर्नस ऑफ शेड्यूल कमर्शियल बँक या शीर्षकाखाली २०१३ सालाचा एप्रिल, २०१५ च्या सुमारास प्रसिध्द केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दशकता कृषी कर्जामध्ये झालेली वाढ ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जामुळे झालेली नसून, शेतकऱ्यांऐवजी कृषी उद्योग व शेतमालाशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या मोठया कंपन्यांनी केलेल्या पतपुरवठ्यामुळे झाली असल्याचे अर्थतज्ञांनी काढलेल्या निष्कर्षात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे बँकाकडून वितरित झालेल्या कृषी कर्जाच्या रकमेत लक्षणीव वाढ झाली असली तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात कृषी कर्जाचा बराच मोठा हिस्सा प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहचतच नसल्याने, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतच आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शेतकऱ्यांच्या नावावर बँकांची लूट करुन, शेतमालाशी संबंधी व्यवसाय करणाऱ्या कंपन्या, गोदामे, शीत गोदामे यांना कर्ज देणाऱ्या बँकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :** (१) बेसिक स्टॉटिस्टिकल रिटर्नस ऑफ शेड्यूल कमर्शियल बँक या विषयावरील कोणताही अहवाल अधिकृतरित्या शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) अहवाल शासन स्तरावर प्राप्त झालेला नसल्याने भाष्य करता येत नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदूर बाजार तालुक्यातील प्राथमिक सेवा सहकारी संस्थेने शेती नसलेल्या नामधारी सदस्यांना संस्थेचे सभासदत्व दिल्याबाबत

**(९) २८८८४ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीधारक शेतकरी हा कोणत्याही प्राथमिक सेवा सहकारी संस्थेचा सदस्य होवू शकतो असे असूनही चांदूर बाजार तालुक्यातील प्राथमिक सेवा सहकारी संस्थेने शेती नसलेल्या सदस्यांना नामधारी सदस्य करून खऱ्या शेतीधारक सदस्यांना संस्थेच्या कारभारापासून

वंचित ठेवल्याने या संस्थेचे गैर शेती सदस्यांना सभासदत्व नाकारून निवडणूक प्रक्रियेपासून दूर ठेवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधि, अचलपूर यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी शासनाकडे मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थांना शिष्यवृत्ती देण्यात येत नसल्याबाबत**

**(१०) २९१३६ (२३-१२-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.सी, एन.टी. व्ही जे एन टी, एसबीसी, ओबीसी, इ, संवर्गातील विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी, कला, विज्ञान, वाणिज्य, औषधीनिर्माण शास्त्र, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, तंत्रानिकेतन व नर्सिंग अशा विविध ठिकाणी प्रवेश घेतल्यानंतर त्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत नाही उलट सदरील शिष्यवृत्ती मार्च, एप्रिल मध्ये दिली जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थांना उच्च शिक्षण घेण्यास अडचणी येतात त्यामुळे मागासवर्गीय विद्यर्थ्यांचा उच्च शिक्षण घेण्याकडे कल अधिक नसल्याची बाब एका सर्वेक्षणातून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित झाल्यानंतर शिष्यवृत्ती देण्याबाबात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

ज्या महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पडताळणी करुन जिल्हा कार्यालयाकडे ऑनलाईनव्दारे सादर केले आहेत अशा पात्र विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या बँक खत्यामध्ये अनुदान जमा करण्यात येते.

(३) अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी असलेली शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन केलेली असून विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन अर्ज छाननी करुन कागदपत्रांच्या पूर्ततेसह जिल्हा समाजकल्याण कार्यालयांना सादर करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे आणि संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्या स्तरावरुन वेळोवेळी देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### महाराष्ट्रातील न्हावी जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याबाबत

**(११) २९४४२ (२३-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील न्हावी जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करावा यासाठी दिनांक २६ जुलै, १९८६ रोजी केंद्र शासनाने विशेष आदेशान्वये महाराष्ट्र शासनाला कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०१-२०१७) :** (१) कार्यासनातील अभिलेखात शोध घेतला असता सदर पत्र आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अल्प व्याजदराची सुविधा मिळण्याबाबत

**(१२) २९६२४ (२२-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यात पर्जन्यमानाच्या बदलामुळे व बँकांनी थकीत कर्जाच्या व्याजाचा दर १२ टक्केपर्यंत नेल्याने दुष्काळग्रस्त शेतकरी त्रस्त झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील २५ हजारांवर शेतकरी थकबाकीदार असल्याने शासनाने यंदा जाहिर केलेल्या अल्प व्याजदराची त्यांना सुविधा मिळू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत रु. १ लाखापर्यंतच्या पीक कर्जाची मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ३% व्याज सवलत तसेच रु.१ ते ३ लाखापर्यंतच्या कर्जासाठी १% व्याज सवलत शासनाकडून देण्यात येते.

५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या गावातील शेतकऱ्यांकडील शेतीशी निगडीत कर्जाचे वसुलीस शासनाने स्थगिती दिली असून खरीप २०१५ च्या हंगामातील पीक कर्जाचे व्याजासह पाच वर्ष मुदतीच्या मध्यम मुदत कर्जामध्ये पुनर्गठन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच अशा पुनर्गठीत कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व पुढील चार वर्षाचे सहा टक्के दराने होणारे व्याज शेतकऱ्यांच्या वतीने शासनाकडून बँकांकडे भरणा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षामध्ये ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या थकबाकीचे पुनर्गठन करण्यासाठी शासनाने रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव पाठविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंडलवाडी-शेळगाव-चन्नापूर व पाटोदा-माष्टी (ता.बिलोली,जि.नांदेड) या उपसा जलसिंचन योजनेच्या शेतकऱ्यांचे कर्ज कमी करण्याबाबत**

**(१३) ३२२४७ (२२-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंडलवाडी-शेळगाव-चन्नापूर व पाटोदा-माष्टी (ता.बिलोली,जि.नांदेड) या उपसा जलसिंचन योजनेच्या शेतकऱ्यांचे कर्ज कमी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) होय.
(२) विदर्भ व मराठवाड्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जमाफीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी उपसा सहकारी जलसिंचन संस्था मर्यादित बारागाव पिंप्री, ता. सिन्नर (जि. नाशिक) योजनेचे कर्ज माफ होणे बाबत**

**(१४) ३५७३७ (२२-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोदावरी उपसा सहकारी जलसिंचन संस्था मर्यादित बारागाव पिंप्री, ता. सिन्नर (जि. नाशिक) योजनेस सन १९८४ साली सुरवात झाली होती. सदर योजनेस नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दीर्घ मुदतीच्या स्वरुपात कर्ज देवू केले होते. योजना तीन वर्षात पूर्णत्वास येणे अपेक्षित असताना कर्जास होणारा विलंब, दीर्घकाळ योजना उभारणी कालावधी यामुळे योजना पूर्णत्वास येऊ शकली नाही. तरी जळगाव व धुळे जिल्यातील संस्थांप्रमाणेच गोदावरी उपसा जलसिंचन संस्थेला कर्ज माफी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. सहकारमंत्री तसेच वित्त मंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधित शेतकऱ्यांचे हाल व त्रास टाळण्यासाठी शासनाने उक्त मागणीच्या अनुशंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) होय.
(२) विदर्भ व मराठवाड्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जमाफीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**युवा जागृती सहकारी पतसंस्था, उमरेड (जि. नागपूर) येथे कर्जाची थकबाकी प्रलंबित असलेल्या सदस्यांची निवड संचालक मंडळावर करण्यात आल्याबाबत**

**(१५) ३९९४५ (२७-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) युवा जागृती सहकारी पतसंस्था, उमरेड (जि. नागपूर) येथे ज्या सदस्यांकडे कर्जाची थकबाकी प्रलंबित आहे त्याच सदस्यांची संचालक मंडळावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संस्थेची आमसभा ही सभासदांची गणपूर्ती नसताना देखील सभेमध्ये अनेक बोगस ठराव मंजूर करून संचालक मंडळातील सदस्य व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे मोठ्या प्रमाणात कर्ज मंजूर करून घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संस्थेच्या काही सदस्यांनी संस्थेने आयोजित केलेल्या सभेची व संस्थेच्या कारभाराची माहिती मागितली असता माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संस्थेच्या काही सदस्यांनी मा. मुख्यमंत्री, मा . सहकार मंत्री, सहायक निबंधक उमरेड, जिल्हा उप निबंधक, नागपूर यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संस्थेची चौकशी करून संचालक मंडळावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे दिनांक १९.१०.२०१५ व दिनांक ३.१२.२०१५ रोजी अपात्र संचालकांवर कार्यवाही करणेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येऊन अधिनियमातील कलम ७३ (क) (अ) (२) व नियम ५८ मधील तरतुदीनुसार दोषी संचानलकांना अपात्र घोषित करण्यात आले आहे.

(२) संस्थेची आमसभा दिनांक २०.९.२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर आमसभा ही गणपूर्तीनुसार झालेली आहे.

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक व त्यांच्या कुटुंबियांनी घेतलेल्या कर्जाची यादी सादर करण्यात आली असता संचालक मंडळ व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे मोठ्या प्रमाणात कर्ज मंजूर केली असल्याचे आढळून आलेले नाही.

(३) संस्थेच्या काही सदस्यांनी संस्थेच्या कारभाराबाबत व आयोजित करण्यात आलेल्या सभांबाबत माहिती मागितली होती. त्यानुसार सभासदांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित संस्थेस जिल्हा उपनिबंधकांनी दिनांक ३.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन शासनास अथवा संबंधित अधिनस्त कार्यालयांना प्राप्त झालेले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह शाखा राजनगर, नागपूर येथील वार्डन यांनी विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यांमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१६) ४०२८६ (२८-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वस्तीगृह शाखा राजनगर, नागपूर येथील वार्डन यांनी विद्यार्थ्यांना ८०० रू. निर्वाह भत्ता न देता २०० ते २५० रू. देऊन आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वार्डनच्या गैरव्यवहाराविरोधात विद्यार्थ्यांनी चोखामेळा वसतीगृह, दिक्षाभुमी, नागपूर येथे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण विभागाने आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या वार्डनवर सेवा समाप्तीची कारवाई केली आहे काय,

(४) असल्यास, आर्थिक गैरव्यवहार व बाहेरील विद्यार्थ्यांना वसतीगृहामध्ये राहण्यास सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली,

(५) या सर्व गैरव्यवहाराची समाजकल्याण विभागाकडून चौकशी केली आहे काय. नसल्यास विलंबनाची कारणे काय.

**श्री. राजकुमार बडोले (०२-०१-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर गैरव्यवहारास जबाबदार असलेले गृहपाल श्री.एस.एच.राऊत यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत कार्यवाही सूरु आहे.

(४) सदर गैरव्यवहार प्रकरणात करण्यात आलेल्या चौकशीतून कोणत्याही अधिका-याचे नाव समोर आलेले नाही. सबब, कोणत्याही अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तापी खोऱ्यातील जलसिंचन योजनाप्रमाणे राज्यातील इतर जलसिंचन योजनांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(१७) ४३१०० (२१-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तापी खोऱ्यातील शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या जलसिंचन योजनांना शासनामार्फत कर्ज माफी देण्यात येते तथापि राज्यातील इतर उपसा जलसिंचन योजनांना कर्जमाफी न दिल्याने भू-विकास बँकाकडून कर्ज वसूली करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नुसार तापी खोऱ्यातील जलसिंचन योजनाप्रमाणे राज्यातील इतर जलसिंचन योजनांना कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सद्यस्थितीत विदर्भ व मराठवाडा उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जास माफी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील शेतकऱ्यांना अल्प मुदतीत पीक कर्ज उपलबध करुन देण्यासाठी, राज्य शासनाने राज्य सहकारी बँकेच्या ४६७ कोटी रुपये कर्जाची हमी घेवून, त्यासंबंधीचे परिपत्रक काढलेबाबत**

**(१८) ४४२०१ (२७-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील शेतकऱ्यांना अल्प मुदतीत पीक कर्ज उपलबध करुन देण्यासाठी, राज्य शासनाने राज्य सहकारी बँकेच्या ४६७ कोटी रुपये कर्जाची हमी घेवून, त्यासंबंधीचे परिपत्रक दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास जारी केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षातील कर्ज वसूलीनंतरच कर्ज देण्याचे धोरण जिल्हा सहकारी बँकांनी कायम ठेवले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना विनाविलंब कर्ज मंजूर व्हावे यासाठी उपायोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :**(१) होय. अंशत: खरे आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पीक कर्ज रुपांतरणासाठी नाबार्डच्या ६०% फेर कर्जास (रक्कम रु. ४६७.६२ कोटी) दि. ०४/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासन हमी देण्यात आली आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
(३) पीक कर्जाचे त्यावरील येणे व्याजासह पुनर्गठन करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये बँकांनी पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांना खालीप्रमाणे पीक कर्ज वाटप कले आहे.

| अ.क्र. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | शेतकरी सभासद | पीक कर्जवाटप रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अकोला +वाशिम | २४८६२ | ७११३.२९ |
| २ | अमरावती | १२९८५ | २९८३.२७ |
| ३ | भंडारा | ५०६५ | २१२७.४९ |
| ४ | गोंदिया | ८४७ | ३५८.३३ |
| ५ | चंद्रपूर | १०६४६ | २६८९.१४ |
| | एकूण | ५४४०५ | १५२७१.५२ |

सन २०१६ च्या खरीप हंगामामध्ये जुन्या कर्जाची परतफेड करण्याचा तसेच नवीन शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्यासाठी बँकामार्फत प्रत्येक तहसील कार्यालय स्तरावर मेळावे आयोजित करुन कर्जवाटपाचे काम करण्यात आले आहे. तसेच खरीप २०१५ मधील पीककर्जाचे पुनर्गठन योजनेबाबत जाहिरातीद्वारे शेतकऱ्यांना माहिती करुन देण्यात आली आहे. दि. ३०/०९/२०१६ अखेर विदर्भातील बँकांनी खालीलप्रमाणे जिल्हानिहाय पीक कर्जवाटप केले आहे.

| अ.क्र. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | शेतकरी | रक्कम रु.लाख |
|---|---|---|---|
| १ | अकोला +वाशिम | १४४८२९ | ८५३०५ |
| २ | अमरावती | ५४९२५ | ३७७३९ |
| ३ | यवतमाळ | ५७३९१ | ३४३८९ |
| ४ | बुलडाणा | १६०८३ | ५०७० |
| ५ | गडचिरोली | ८०१९७ | ४३०२१ |
| ६ | चंद्रपूर | ६३५३५ | २७४९० |
| ७ | भंडारा | ३२६३६ | ११२३२ |
| ८ | गोंदिया | १६२१७ | ८१६९ |
| | एकूण | ४६५८१३ | २५२४१५ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भ मराठवाड्यातील सावकारी कर्जमाफीकरीता दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयातील क्षेत्राची अट रद्द करुन सरसकट सर्व पात्र लाभार्थ्यांना कर्ज माफीचा लाभ देण्याबाबत**

**(१९) ४५०१४ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ मराठवाड्यातील सावकारी कर्जमाफीकरीता दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयातील क्षेत्राची अट रद्द करुन सरसकट सर्व पात्र लाभार्थ्यांना कर्ज माफीचा लाभ देण्याबाबत विसस अचलपूर यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी मा. मंत्री महसूल यांना लेखी पत्र देऊन मागणी केली होती , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व पात्र लाभार्थ्यांना कर्ज माफीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

शासनास वि.स.स. अचलपूर यांचे दि.३१.०८.२०१५ रोजी मा.मंत्री (महसूल) यांना दिलेले पत्र प्राप्त झालेले आहे.

(२) शासन निर्णय क्रमांक एमएलए-१०१५/प्र.क्र.२५/७- स, दिनांक १० एप्रिल, २०१५ मध्ये नमूद केल्यानुसार पात्र कर्जबाजारी शेतक-यांना सावकारी कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांना कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या अटी व दलालांच्या त्रासातून सोडविण्याबाबत**

**(२०) ५०२९४ (२७-०४-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना आधुनिक सुविधासह त्यांचा शेतमाल थेट ग्राहकांना विकता यावा याकरीता बाजार समित्यांच्या जाचक अटी व दलालांच्या त्रासातून शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी शासनाने पणन कायद्यात व व्यवस्थेमध्ये महत्वाचे बदल करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी केंद्रभूत ठेवून शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव तसेच त्यांना विक्री आणि निर्यातीचे स्वातंत्र्य मिळणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासोबत कृषीपणन केंद्रीत संशोधनाला चालना देणे, स्पर्धात्मकता बाजर समिती सक्षमीकरण, कोल्ड स्टोरेज व पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी केंद्रबिंदू ठेवून वरील शेतकरी हिताचे बदल लवकर करण्यासाठी शासन काय धोरणात्मक निर्णय वा उपाय योजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय. राज्यातील बाजार समित्यांमध्ये मुलभूत पायाभूत सुविधा व शेतमालाच्या मुल्यवर्धन सुविधा निर्माण करण्याच्या अनुषंगाने पणन मंडळाने बाजार समित्यांच्या सहभागाने बाजार समित्यांचा सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीकरीता रु. ९३२८.५० कोटींचा व्यवसाय विकास आराखडा तयार केला आहे.

(४) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालय (जि.कोल्हापूर) येथून अनुसूचित जाती उपयोजनेतून साकव मंजूरीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(२१) ५१५७२ (२८-०४-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालय (जि.कोल्हापूर) येथून अनुसूचित

जाती उपयोजनेतून साकव मंजूरीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दलित वस्ती साकव योजनेमध्ये मंजूर साकव हे योग्य कागदपत्रांची पूर्तता न करता मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, समाजकल्याण उपायुक्त विजय गायकवाड व सहकारी श्री.चिकणे हे साकव मंजूरी प्रक्रियेमध्ये आर्थिक व्यवहार करतात, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पीक कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करणेबाबत**

**(२२) ५२६८८ (२७-०४-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय रिजर्व्ह बँकेने दिनांक ११ मे, २०१२ रोजी पिक कर्जाबाबत सुधारित योजना जाहीर करुन पिक कर्जासाठी केवळ पिकाचे तारण ठेवणे बाबत बँकांना सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रु. १ लाख मर्यादेतील कर्जाच्या तारणासाठी बँकेने नोंदविलेल्या कर्जाचा बोजा कमी करण्याची मोहिम जिल्हाधिकारी, लातूर यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राबविली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिजर्व्ह बँकेच्या उक्त निर्देशानुसार बीड जिल्ह्यासह राज्यातील कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उतराऱ्यावरील कर्जाची नोंद कमी करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ४८ (अ) मधील तरतूदीनुसार कर्जदाराच्या जमिनीवर कर्ज रकमेचा भार/बोजा ७/१२ पत्रकामध्ये इतर हक्क सदरामध्ये नोंदविला जातो. त्यामुळे संबंधित शेतक-यांच्या संबंधित जमिनीवरील पीक उत्पादनासाठी

बँकेने कर्ज दिल्याचे निदर्शनास येते. असा बोजा निर्माण करण्यासाठी व त्याची नोंद करण्यासाठी शेतक-यास मुद्रांक शुल्क अथवा नोंदणी फी भरावी लागत नाही. उक्त कायदेशीर तरतूदीमुळे कर्जदार शेतक-यांच्या ७/१२ उता-यावरील पीक कर्जाची नोंद कमी करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निर्यात करावयाच्या साखरेची राज्यात साठवणूक सुरु असल्याबाबत**

**(२३) ५३५४२ (२२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने निर्यातीसाठी ठरवून दिलेला साखरेचा कोटा अद्यापही गोदामात पडून असून, राज्यातील साठेबाजांनी निर्यातीच्या कोठ्यातील सुमारे एक लाख मेट्रीक टन साखर गोदामात जमा करुन ठेवल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याआधारे वायदे बाजारातील साखरेचे भाव कृत्रिमरित्या वाढविण्यात आल्यामुळे साखरेच्या जागतिक पातळीवरील किंमतीच्या तुलनेत महाराष्ट्रातील साखर महागडी ठरु लागल्याने राज्यातील साखर कारखान्याकडील साखरेला उठाव नसल्याने ती पडूनच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यापाऱ्यांनी साठेबाजी करुन ठेवलेल्या साखरेवर नफा मिळविल्यानंतर सदर साखर बाजारात आणली जाईल परिणामी साखरेचे दर कोसळण्याची भिती साखर कारखन्यांना वाटत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान पहिल्या आठवड्यात मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन साठेबाजांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर ती मान्य केली, तथापि अद्यापही साठेबाजांवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, साठे बाजांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०१-२०१७) :**(१), (२) व (३) राज्यातील साठेबाजांनी निर्यातीच्या कोटयातील सुमारे एक लाख मेट्रिक टन साखर गोदामात जमा करुन ठेवल्याबाबत दि.६.१.२०१५ च्या निवेदनाव्दारे मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी साठेबाजांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.
(४) व (५) केंद्र शासनाच्या दि.२९.४.२०१६ च्या अध्यादेशाव्दारे साखरेच्या घाऊक व किरकोळ व्यापा-यांवर साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे. सदर अध्यादेशाला दि.२७.१०.२०१६ च्या अध्यादेशाव्दारे दि.२८.५.२०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानुषंगाने सदर दोन्ही अध्यादेश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने माहितीस्तव पुन:प्रकाशित केले आहे. साठा

मर्यादेच्या अध्यादेशानुसार नियंत्रक शिधावाटप अंतर्गत मुंबई-ठाणे क्षेत्र, कोकण, नाशिक, पुणे या विभागात साठा मर्यादेचे उल्लंघन झालेले नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवला नाही.

तथापि, अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यात आढळलेला साखरेला अतिरिक्त साठा जप्त करण्यात आला असून, त्यांच्या विल्हेवाट संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

तसेच, नागपूर विभागातील नागपूर (शहर) मध्ये एकूण ७ अनुज्ञाप्ती धारकांविरुध्द किरकोळ दोष आढळून आल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक परवाना/अनुज्ञप्ती आदेश १९९८ व सुधारणा आदेश २००७ अन्वये प्रकरणे पंजीबध्द करुन रु.१७५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

---

**राज्यात कोणताही उद्योग सुरु करण्यासाठी लागणाऱ्या विविध विभागाच्या परवानग्याबाबत**

**(२४) ५४५२० (२२-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोणताही उद्योग सुरु करण्यासाठी लागणाऱ्या विविध विभागाच्या परवानग्या घेण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विना परवाना उद्योग यामध्ये कोणकोणत्या उद्योगांचा समावेश आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

"मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने/संमती उपलब्ध करुन देण्यासाठी मैत्री कक्षांतर्गत "एक खिडकी योजना" शासन निर्णय दिनांक ११/२/२०१६ अन्वये सुरु करण्यात आली आहे.

मेक इन महाराष्ट्र आणि Ease of Doing Business च्या अंतर्गत मा.मुख्यमंत्री तसेच मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात येतो व त्या अंतर्गत बांधकाम, कामगार विभाग, उद्योग विभाग, MPCB, विद्युत जोडणी तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून लागणाऱ्या मंजुऱ्यांची संख्या व कालावधी त्याचप्रमाणे इतर विभागांच्या परवान्यांची संख्या व कालावधी कमी करण्यात आला आहे. तसेच नदी नियमन क्षेत्र, मुंबई प्राधिकरण स्थान निश्चिती धोरणांतर्गत लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून, ठराविक मर्यादेपर्यंत औद्योगिक बांधकामासाठी पर्यावरण विभागाच्या संमतीची आवश्यकता नाही. अशा अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या, अन्न-धान्य वाहतूक दरासंबंधी निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२५) ५५०४३ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या, अन्न-धान्य वाहतूक दरासंबंधी निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याच्या प्राप्त तक्रारीवर शासनातर्फे सुरु असलेली तपासणीची कार्यवाही अद्याप पूर्ण करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त तक्रारीनुसार शासनाने याबाबत चौकशी करुन, दोषी अधिकारी व कंत्राटदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येतआहे,

(३) तसेच निश्चित किती कालावधीपर्यंत शासनातर्फे कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०१-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) जळगांव वखार केंद्रासाठीच्या ई-निविदेसंदर्भात एका कंत्राटदाराने अनुभवाचे चुकीचे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे व संनगमताने निविदा भरल्याबद्दल तीन कंत्राटदारांना, कारणे दाखवा नोटीस देऊन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी अपात्र ठरवले आहे. मात्र संबंधित कंत्राटदारांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.३३८७/२०१६, क्र.३५७८/२०१६, क्र.३७८७/२०१६, क्र.४३४९/२०१६ अन्वये याचिका दाखल केलेल्या होत्या.

मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, यांनी याचिकाकर्त्यांना अपात्र ठरविल्याबद्दलचा निर्णय रद्द ठरवून नव्याने प्रक्रिया राबविणे किंवा सर्व संबंधित कंत्राटदारांना पुन्हा सुनावणीची संधी देऊन, याबाबत एक महिन्यात अंतिम निर्णय घेण्याचे दि.११.७.२०१६ आदेश दिले होते.

मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांच्या या आदेशानुसार वखार महामंडळाने सर्व संबंधित कंत्राटदारांना सुनावणीची संधी देऊन राज ट्रान्सपोर्ट, लातूर यांना जळगांव वखार केंद्रावरील दि.१५.११.२०१६ ते दि.१४.११.२०१८ या कालावधी करीता कामाचा ठेका मंजूर केला आहे.

---

**सोलापूर जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीमुळे थकित कर्जावरील व्याजमाफी देणेबाबत**

**(२६) ५५२४४ (२२-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयामधील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांकडे असलेल्या थकित कर्जाचे पुनर्गठन करून व्याजमाफी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयामध्ये अश्या प्रकारचे थकित कर्ज किती आहे,

(३) असल्यास, यापैकी किती शेतकऱ्यांना व्याज माफी दिलेली आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :** (१) होय.

(२) सोलापूर जिल्ह्यामध्ये सन २०१५-१६ मधील पीक कर्ज पुनर्गठणासाठी पात्र खातेदार शेतकरी २२७४७ असून त्यांची थकीत कर्ज रक्कम रु.२८०३३.७५ लाख इतकी आहे. त्यापैकी बँकांनी १८०२८ शेतक-यांचे रु.२०१.४० कोटीचे पीक कर्जाचे पुनर्गठन केले आहे.

(३) सोलापूर जिल्ह्यात पीक कर्जाचे पुनर्गठन झालेल्या १८०२८ शेतक-यांनी पुनर्गठीत कर्जाचा हप्ता विहीत मुदतीत भरल्यास ते पुनर्गठीत कर्जावरील प्रथम वर्षाच्या संपूर्ण व्याज माफीस पात्र ठरतील.

---

**राज्यातील कागदोपत्री नोंदविल्या गेलेल्या सहकारी संस्थांवर अवसायक नेमण्याबाबत**

**(२७) ५५५३६ (२२-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कागदोपत्री नोंदविल्या गेलेल्या सुमारे ४९ हजार ५८४ सहकारी संस्थांपैकी आठ हजार ५१६ सहकारी संस्थांवर सहकार खात्याने कारवाई करुन त्यांची नोंदणी रद्द केली व ३४ हजार ७८४ सहकारी संस्थांवर अवसायक नेमण्यात आले असून मार्च महिन्याअखेरीस अन्य संस्थांच्या नोंदणी रद्द आणि अवसायक नेमले जाणार असल्याचे राज्याचे सहकार आयुक्त यांनी माहे मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवसायकाची राज्यस्तरीय कार्यशाळा घेण्यात आली असून त्यांना मास्टर ट्रेनर्स तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत अद्यापपर्यंत सहकारी संस्थांवर किती अवसायक नेमण्यात आले आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०१-२०१७) :**(१) मार्च, २०१६ अखेरीस सर्वेक्षणामध्ये बंद, कार्यस्थगित व ठावठिकाणा नसलेल्या ५४१२४ संस्थापैकी ४८,३३२ अवसायक नेमण्यात आलेले असून १९,७८२ संस्थांची नोंदणी रद्द केलेली आहे.

(२) होय. दिनांक १६.१.२०१६ रोजी “अवसायक कामकाज” बाबतची एक कार्यशाळा पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. उपस्थित अधिकारी व कर्मचा-यांना अवसायनाचे कामकाज विषयाबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) अद्यापपर्यंत ४८,३३२ सहकारी संस्थांवर अवसायक नेमण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विनापरवाना सावकारी व्यवसाय सुरू असल्याबाबत**

**(२८) ५५५७० (२२-०८-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरखेड (जि.जळगांव), माळीनगर (जि.सोलापूर) व मुंबईसह राज्यात खाजगी सावकरी व्यवसाय तेजीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत १४२३ नोंदणीकृत सावकारांची संख्या असून २०१५-१६ या आर्थिक वर्षात तब्बल २४,५३४ कर्जदारांना सुमारे ९० कोटी रुपयांचे कर्ज दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी सावकरांच्या कर्जामुळे आत्महत्यांमध्ये वाढ होत असून खासगी सावकारांच्या कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाढत्या खाजगी सावकरांच्या धंद्यावर रोख लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) मुंबईमध्ये नोंदणीकृत सावकारांची संख्या १८९३ असून सन २०१५-१६ मध्ये २८,९०७ कर्जदारांना रु.९८.३८ कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) बेकायदेशीर सावकारीबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनिम, २०१४ मधील तरतूदीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.

राज्यात ऑगस्ट, २०१६ अखेर अधिनियमाच्या कलम १८ (१) अन्वये एकूण ७५७ प्रकरणे दाखल झाली आहेत. त्यापैकी ३९५ प्रकरणी सुनावणी सुरु असून २९५ प्रकरणी अर्जदारांचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत. उर्वरित प्रकरणी अद्याप सुनावणी घेण्यात आलेली नाही.

सुनावणी सुरु असलेल्या ३९५ प्रकरणांपैकी ७८ प्रकरणांमध्ये एकूण ११४.७६ हे.आर एवढी जमीन संबंधीत अर्जदारांना परत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी सावकारी कर्जमाफी योजनेंतर्गत मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पुरेसा न्याय मिळाला नसल्याबाबत**

**(२९) ५५९५८ (२२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी सावकारी कर्जमाफी योजनेंतर्गत विदर्भ आणि मराठवाड्यातील अवघ्या ४६ हजार ४९१ शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली असून यातही मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पुरेसा न्याय मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांना ६१ कोटी ३४ लाख रुपयांची कर्जमुक्ती मिळाली. परंतु गेल्या तीन महिन्यांत २६० आत्महत्या झालेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अवघे ४ कोटी ७१ लाख रुपये माफ केले. त्यात मुदत संपल्याने योजना ठप्प झाली असल्याने मुदत वाढविण्याचा प्रस्ताव शेतकऱ्यांनी शासनाकडे पाठविला असून तो शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न २ बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांनी परवानाधारक सावकारांकडून कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय क्र.एमएलए १०१५/ प्र.क्र २५/७-स, दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करयात आला. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या लाभार्थींच्या पात्रतेच्या निकषाची पूर्तता करणा-या कर्जबाजारी शेतक-यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयात योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी दि.३०.६.२०१५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि नंतर सदर मुदत दि.३१.३.२०१६ पर्यंत वाढविण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूग जिल्ह्यातील शासनमान्य अनुदानित वसतिगृहांना मंजूर केलाला निधी वाटपाअभावी शासनास परत गेल्याबाबत**

**(३०) ५५९७२ (२०-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे**

**पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूग जिल्ह्यातील शासनमान्य अनुदानित वसतिगृहांना सुमारे चार कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता मात्र मुंबई विभागीय प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हा निधी ३१ मार्च रोजी वितरित न केल्यामुळे शासनास परत गेला त्यामुळे सुमारे १२५ वसतिगृहांना फटका बसल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून मंजुर निधी संबंधित वसतीगृहांना तातडीने वाटप करण्याचे शासनाचे आदेश आहेत, मात्र या आदेशाला सामाजिक न्याय विभागातील अधिकारी जुमानत नसल्याने निधी वाटपाच्या कामात दिरंगाई करीत असल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले असल्याने प्रश्न भाग-१ बाबत चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात संबंधीतांवर कारवाई करु सदरील वसतिगृहांना त्वरीत अनुदान वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३), (४) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे कार्यालयाकडून प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग यांना दि.३१ मार्च, २०१६ रोजी रात्री १९.५६ वा रु.४,४०,७७,००० तरतूद संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आली होती. तथापि, यानंतर सदरहू संगणकीय वितरण प्रणाली बंद पडल्याने सदरहू रक्कम वितरीत करता न आल्याचे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग यांनी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे कार्यालयास कळविले आहे.

रक्कम वितरीत न केल्याबाबत आयुक्त,समाजकल्याण, पुणे यांनी दि.३०/७/२०१६ रोजीच्या पत्राव्दारे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई यांचा खुलासा मागविलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**पुणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉसीबीलीटी निधी (सी.एस.आर.) खर्च करत नसल्याबाबत**

**(३१) ५६१९४ (२२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन कॉर्पोरेट सोशल रिस्पॉसीबीलीटी निधी (सी.एस.आर.) निधी खर्च करत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथे दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास विभागीय जलयुक्त शिवार योजनेच्या आढावा बैठकित ग्रामविकास मंत्री यांच्या सहमत पुणे जिल्ह्यातील काही मोजक्याच कंपन्यांनी जलयुक्त शिवार योजनेसाठी सि.एस.आर. निधी दिल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सि.एस.आर. निधीतून जलयुक्त शिवार योजनेचे काम करताना अनेक कंपन्या अंदाज पत्रक बनवत नसल्याचे व बनावट कामे दाखवून मोठ्या प्रमाणातील सि.एस.आर. निधी वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्ह्यातील सर्व औद्योगीक कंपन्यांना सि.एस.आर. निधी जलयुक्त शिवार योजनेसाठी खर्च करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ?

**श्री. सुभाष देसाई (०५-१२-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियानामधील कामांसाठी सी.एस.आर. निधी उपलब्ध करुन देणेबाबत ४५० कंपन्यांना आवाहन केले होते. त्यापैकी सन २०१५-२०१६ मध्ये निवडलेल्या गावांमध्ये ६२ कंपन्यांनी सहभाग नोंदवून १९९ कामे हाती घेतली होती व रु.१२.८८ कोटी निधीची कामे केली आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये निवड केलेल्या गावांमध्ये २२ कंपन्यांनी सहभाग नोंदवून रु.९.७९ कोटी निधीची कामे केलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

सी.एस.आर.निधीतून कामे करताना, कामांची अंदाजपत्रके संबंधित विभागामार्फत करण्यात आलेली आहेत व अंदाजपत्रकाप्रमाणे कंपन्यांनी कामे करुन निधी खर्च केलेला आहे.

(४) सन २०१६-२०१७ मध्ये सर्व औद्योगिक कंपन्यांकडून सी.एस.आर.निधी मिळविण्यासाठी उपविभागीय अधिकारी (प्रांत) व जिल्हाधिकारी यांचेमार्फत आढावा बैठकीमध्ये व प्रत्यक्ष भेटीव्दारे कंपन्यांचा सी.एस.आर. उपलब्ध करून देणेबाबत आवाहन केले आहे.

---

**हिंगोली (जि.हिंगोली) येथील महात्मा फुले विकास महामंडळाचा कारभार पहाण्यासाठी कामयस्वरुपी अधिकारी देण्याबाबत**

**(३२) ५६४८२ (२०-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) येथील महात्मा फुले विकास महामंडळाचा कारभार कायम प्रभारीवरच सुरु असल्याने अनेक लाभार्थ्यांची कर्ज प्रस्तावासाठी गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळाचा कारभार पहाण्यासाठी कामयस्वरुपी अधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७) :**(१) होय.

(२) माहे ऑगस्ट, २०१६ पासून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या हिंगोली जिल्हा कार्यालयात नियमित अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील उद्योगांना सामूहिक योजनेअंतर्गत**
**कोणताच फायदा मिळत नसल्याबाबत**

**(३३) ५७०५५ (२२-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील उद्योगांना सामूहिक योजनेअंतर्गत कोणताच फायदा मिळत नसल्याने उद्योजकांना महिन्याकाठी शासनाला ६२ टक्के कर भरावा लागत असल्याने गेल्या १० वर्षात जिल्ह्यात एकाही मोठ्या उद्योगांची स्थापना झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने एक खिडकी योजनांच्या माध्यमातून सर्व प्रमाणपत्रे देण्याची घोषणा करुनही या घोषणेची नाशिक जिल्ह्यात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

गेल्या १० वर्षात (सन २००७ ते २०१६) शासनातर्फे सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ व २०१३ राबविण्यात येत आहेत. या कालावधीमध्ये दोन्ही योजनांतर्गत नाशिक जिल्ह्यातील मोठया/विशाल उद्योगांचे एकंदर ९९ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ४४ उद्योगांना पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली असून, प्रोत्साहनास पात्र ठरविण्यात आले आहे. नाशिक जिल्हा क, ड व ड+ असा वर्गीकृत असून उद्योगांना विविध प्रोत्साहने देय केली आहेत.

(२) राज्यात उद्योग स्थापन करण्याकरीता सर्व ना हरकती/परवाने/मंजूऱ्या एकाच ठिकाणी उद्योजकांना तातडीने व सुलभरित्या प्राप्त होण्याकरीता एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय दि.११/२/२०१६ च्या शासनानिर्णयान्वये घेण्यात आला. एक खिडकी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध विभागांच्या मंत्री कक्ष सक्षम करण्याकरीता विविध विभागाच्या गट अ ते क संवर्गातील ४१ पदांच्या निर्मितीस दि.१८/६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत मंत्री कक्ष राज्यस्तरीय असून एक खिडकी योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यासह राज्यातील अन्य जिल्ह्यांना देखील देण्यात येतो.

(३) उद्योजकांच्या समस्या सोडवण्याकरीता देखिल राज्यस्तरावरील मैत्री कक्षा मार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.

तसेच विभागीय स्तरावर देखील मैत्री कक्ष स्थापन करण्यात आले असून शासन निर्णय दिनांक २८/०७/२०१५ उद्योग सह संचालक, नाशिक कार्यालय यांच्या कार्यालयात मैत्री कक्षाचे गठन करण्यात आले आहे. सदर कक्ष नाशिक परिक्षेत्रातील उद्योजकांच्या समस्या सोडविण्यास मदत करत आहे.

---

**राज्यात फळे व भाजीपाला विक्रीची 'सफल' केंद्रे सुरू करण्याबाबत**

**(३४) ५७५९५ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाची शेतक-यांना कायदेशीर ठरलेली फळे व भाजीपाला विक्रीची 'सफल' केंद्रे दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रातही सुरु करण्यात येतील व तासा सांमजस्य करार करण्यात येईल असे राज्याचे सहकारमंत्री यांनी जाहीर केले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना थेट लाभ देणारी ही योजना राज्यात कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, काहीच कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) होय.

(२) मंत्री (पणन) यांनी दि.१६ एप्रिल, २०१६ रोजी दिल्ली येथे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने (एन.डी.डी.बी.) सुरु केलेल्या 'सफल' च्या वितरण केंद्राला भेट देवून दिल्ली शहरात ताजी फळे व भाजीपाला वितरण व्यवस्थेची पाहणी केली आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर अहवाल बनविण्याबाबत राष्ट्रीय डेअरी विकास मंडळास दि.१८.०६.२०१६ च्या पत्राव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

(३) लागू नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची लाभार्थ्यांकडे ८ कोटी रुपयाची थकबाकी असल्याबाबत**

**(३५) ५८२३९ (२०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची जिल्ह्यातील जवळपास अडीच हजार लाभार्थ्यांकडे ८ कोटी रुपयाची थकबाकी असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाकडून कर्ज मिळाल्यानंतर लाभार्थ्यांची कर्जाची रक्कम भरली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महामंडळामार्फत माहे मे, २०१६ अखरेपर्यंत विविध योजनेअंतर्गत २७५९ लाभार्थींना कर्ज निधीचे वितरण केले आहे. त्यांची एकूण वसुलपात्र रक्कम रु.५.९७ कोटी असून त्यापैकी रु.५७.४७ लाख इतका निधी वसुलीपोटी प्राप्त झाला आहे. तसेच, एकूण थकित रक्कम रु.५.३९ कोटी एवढी आहे.

(२) व (३) महामंडळाच्या कार्यालयामार्फत वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बँकाचा पीक कर्ज वाटपाचा लक्षांक वाढविणेबाबत**

**(३६) ५८५३७ (२२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याबाबत राज्यातील प्रत्येक बँकाना निर्धारित लक्षांक घालून दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांची संख्या व दुष्काळग्रस्त परिस्थिती पाहता हा लक्षांक खूपच कमी असल्याने मोठया प्रमाणात शेतकरी वर्ग हा पीक कर्जापासून वंचित राहतो, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दि.३०/०९/२०१६ अखेर ४८,००,८७३ शेतक-यांना रु.३२९६३ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. दि.३०/०९/२०१४ च्या तुलनेमध्ये दि.३१/१०/२०१६ रोजी ७,१८,५३१ वाढीव शेतक-यांना वाढीव रु.८८५९ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. तसेच दि.३०/०९/२०१५ च्या तुलनेमध्ये दि.३१/१०/२०१६ रोजी ८१,८२१ शेतक-यांना वाढीव रु.३४८७ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाला निधी मिळाला नसल्याबाबत

**(३७) ५८६४० (२०-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाला मे, २०१६ हा महिना संपत आला तरी यावर्षीचा निधी मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापुर जिल्ह्यातील मातंग समाजाची अनेक कर्ज प्रकरणे प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी अदयापर्यंत न मिळण्याची कारणे काय आहे तसेच निधी केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७) :**(१) अंशत: होय, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेकरीता रु.३८ कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून त्यापैकी रु.८ कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यात आली आहे. तसेच, बीज भांडवल योजनेकरीता रु.७५ कोटी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली असून सदरील तरतूद वित्त विभागाच्या पुढील निर्देशानुसार महामंडळास वितरीत करण्यात येईल.

(२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत अनुदान योजनेअंतर्गत ८९ लाभार्थींना रु.८.९० लाख इतका निधी तसेच, बीजभांडवल योजनेअंतर्गत ३१ लाभार्थींना रु.३७.४७ लाख इतका निधी महामंडळाकडील शिल्लक निधीतून वितरीत करण्यात आला आहे. अर्जदारांनी पूर्तता न केलेले २५ कर्ज प्रकरणे महामंडळाच्या कोल्हापूर जिल्हा कार्यालयाकडे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा निधी प्रादेशिक कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात गेल्या ४-५ वर्षात हवामानातील बदलामुळे राज्यात वारंवार दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होऊन दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांचा पिककर्ज घेण्याकडे कल वाढत असल्याबाबत

**(३८) ५९३७७ (२२-०८-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या ४-५ वर्षात हवामानातील बदलामुळे राज्यात वारंवार दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना व सन २०१५-१६ मध्ये पर्जन्यमान असमाधानकारक झाल्याने

दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांचा पिककर्ज घेण्याकडे कल वाढला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सततची दुष्काळी परिस्थिती व आर्थिक चणचण यामुळे शेतकऱ्यांचा पिककर्ज घेण्याकडे कल वाढलेला असतानासुद्धा नागरी बँकांकडून अद्यापही शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्ज वितरण प्रक्रियेवेळी अतिरिक्त यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे बरेचसे शेतकरी कर्जापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिककर्ज वाटपासाठी शासन कोणते प्रयत्न करत आहे वा करण्यात येत आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) नाही. हे खरे आहे.
(२) व (३) नाही. हे खरे नाही. राज्यातील विविध बँकांनी माहे ३०/९/२०१४ अखेर ४०.८२ लाख शेतक-यांना रु.२४१०४ कोटी पीक कर्ज वाटप केले व माहे ३०/९/२०१६ अखेर ४७.१९ लाख शेतक-यांना रु.२९४७६ कोटी पीक कर्ज वाटप केले तर या वर्षी दि.३०/९/२०१६ अखेर ४७.८३ लाख शेतक-यांना रु.३२७३२ कोटींचे पीक कर्ज वाटप केल्याचे स्पष्ट होत आहे. एकंदरीत दि.३०/९/२०१४ च्या तुलनेमध्ये दिनांक ३०/९/२०१६ रोजी ७,००,९३५ वाढीव शेतक-यांना वाढीव रु. ८६२८ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. तसेच दि. ३०/९/२०१५ च्या तुलनेमध्ये दि. ३०/९/२०१६ रोजी ६४,२२५ शेतकऱ्यांना वाढीव रु.३२५६ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेमध्ये बँकाचे कमी कर्ज वाटप झाल्याचे अथवा बँकांनी कमी कर्ज वाटप केल्याची बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.
(४) मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/४/२०१६ रोजी राज्य स्तरीय खरीप आढावा बैठकीमध्ये सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि कृषी व सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांना खरीप आढाव्याच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत. तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली रु.११/५/२०१६ रोजी राज्य स्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पीक कर्ज वितरणाबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याच अनुषंगाने मा.पालक मंत्री यांनी जूनच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या जिल्हयातील पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने आढावा बैठका घेतल्या. मा.मंख्यमंत्री महोदय यांनी दि.३/६/२०१६ व २७/६/२०१६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारा सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व सहकार क्षेत्रातील अधिकारी यांच्यासमवेत पीक कर्ज वाटपाचा आढावा घेतला आहे. तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार महसूल व वन विभागामार्फत रु.१ लाख ते रु.२.५ लाख पीक कर्जावर एक वर्षासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचे आदेश दि.४/६/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले. परिणामस्वरुप या वर्षी माहे ३० सप्टेंबर अखेर ६४,२२५ शेतक-यांना वाढीव रु.३२५६ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

---

**बुलडाणा जिल्हयात एक लाख रूपयावरील पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून होत असलेल्या सर्च रिपोर्टच्या सक्तीबाबत**

**(३९) ६०११४ (२२-०८-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयात एक लाख रूपयावरील पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून सर्च रिपोर्टसाठी सक्ती केली जात असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्च रिपोर्टसाठी शेतक-यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन शेतक-यांना सर्च रिपोर्टसाठी येणा-या खर्चाची प्रतिपूर्ती करणार आहे काय,

(४) नसल्यास, शेतक-यांसाठी या बाबत शासनाकडून कोणत्या उपाय योजना करण्यात येणार आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :**(१) होय. भारतीय रिझार्व्ह बँक परिपत्रक ११ मे, २०१२/५५३ मधील पॅरा क्र.१२(iii) मध्ये नमूद केलेल्या निर्देशानुसार सर्च रिपोर्ट घेतला जातो.

(२) होय.

(३) असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचारधीन नाही.

(४) सर्च रिपोर्ट हा भारतीय रिझार्व्ह बँकेच्या निर्देशानुसार घेण्यात येत असल्याने याबाबत शासन स्तरावरुन वेगळ्या उपाययोजनेची आवश्यकता दिसून येत नाही.

---

**गडचिरोली जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्येशिय विकास बँकेतील कर्मचा-यांचे वेतन थकीत असल्याबाबत**

**(४०) ६०२३३ (२२-०८-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्येशिय विकास बँकेतील कर्मचा-यांचे मागील ३१ महिण्यांपासून वेतन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २४ जुलै, २०१५ रोजीचे परिपत्रानुसार उक्त बँकेतील ५० वयवर्षाच्या आतील कर्मचा-यांना शासन सेवेत सामवून घेण्याचे व ५० वय वर्षावरील कर्मचा-यांना बँकेची स्थावर मालमत्ता निकाली काढून मुदतपूर्व सेवानिवृत्ती देण्यात येणार असल्याचे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय क्र. एलडीबी १०१३/प्र.क्र.६९९/७-स, दि.२४.०७.२०१५ अन्वये भूविकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार भूविकास बँकेच्या ज्या कर्मचा-याचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे अशा कर्मचा-यांच्या वयाची कमाल मर्यादा शिथिल करुन असे कर्मचारी नोकर भरतीच्या प्रचलीत पध्दतीनुसार व त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षापर्यंत राज्य शासनाच्या सेवेत भरतीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे त्यानुषंगाने दि.३१.०८.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

बँकेची मालमत्ता विक्री करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर मान्यतेस अनुसरुन ई.टेंटरीग निविदेची प्रक्रिया सुरु करण्याबाबत दि.२६.०९.२०१६ च्या पत्रान्वये सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वैश्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने सव्वा कोटी रुपये कर्ज बेकायदा मंजूर केल्याबाबत**

**(४१) ६०५३७ (२२-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वैश्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने सन २००१-०२ या कालावधीत सव्वा कोटी रुपये कर्ज बेकायदा मंजूर केल्याप्रकरणी, सर्व संचालकांना निर्दोष मुक्त करुन, मृत महाव्यवस्थापकाच्या विधवा महिलेवर ठपका ठेवून वसूलीचे आदेश काढले असून सदर प्रकरणात दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास सुनावणी घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने उच्चस्तरावरुन चौकशी केली आहे काय, त्यानुसार निर्दोष विधवा महिलेवर ठेवलेला चुकीचा ठपका व वसुलीचे आदेश रदद करुन, दोषी संचालकांविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) असल्यास, या संदर्भात विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, मुंबई यांनी तत्कालिन संचालक मंडळाविरुध्द मुंबई पोलीस आर्थिक गुन्हे विभाग, यांच्याकडे गुन्हा दाखल केला असतांनाही सदर आर्थिक गुन्हे विभागाच्या अधिका-यांनी तत्कालिन संचालक मंडळाला दोष मुक्त केले याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

वैश्य सहकारी बँक, लि.मुंबई या बँकेच्या सन २००० ते २००२ या कालावधीमध्ये केलेल्या बेकायदा कर्ज वाटपाबाबत बँकेचे तत्कालीन महाव्यवस्थापक श्री.विश्वनाथ जनार्दन नरवणे (सध्या मयत) यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात आले आहे. त्यानुसार त्यांच्या मालमत्तेमधून रक्कम रु.१,३०,३६,६००/- व सदर रक्कम पूर्णपणे वसूल होईपर्यंत १४% दराने व्याज तसेच चौकशीचा खर्च रु.२१,०००/- इतकी रक्कम त्यांचे वारस श्रीमती सुषमा विश्वानाथ नरवणे यांचेकडून वसूल करण्याचे आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या चौकशी अधिका-यांनी दिले . सदर आदेशाविरुध्द श्रीमती नरवणे यांनी अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये मा.मंत्री (सहकार) यांचकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला.

सदर पुनरिक्षण अर्ज मा.मंत्री (सहकार) यांच्या दिनांक ३१.५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर करण्यात आला आहे.

(३) बँकेच्या सन २००१-०२ या कालावधीच्या विशेष लेखा परिक्षण अहवालानुसार तत्कालीन बँक कर्मचारी व संचालक मंडळ यांनी रु.१.३६ कोटी इतक्या रक्कमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले असल्याने श्री.अनिल पाटील, विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ यांनी दिनांक २२.९.२००७ रोजी आर्थिक गुन्हे शाखा कक्ष-१, मुंबई यांचेकडे गुन्हा दाखल केला.

आर्थिक गुन्हे शाखेच्या दिनांक २२.९.२०११ रोजीच्या चौकशी अहवालानुसार बँकेचे संचालक व अधिकारी यांचे विरुध्द कोणताही पुरावा न मिळाल्याने त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्योगांसाठी असलेल्या औद्योगिक प्लॉटपैकी २० टक्के अनुसूचित जमातीती ल उद्योगांसाठी आरक्षित ठेवण्याबाबत

**(४२) ६१३१६ (२२-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमआयडीसीमध्ये उपलब्ध असलेल्या एकूण सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी असलेल्या औद्योगिक प्लॉटपैकी २० टक्के अनुसूचित जमातीतील उद्योगांसाठी आरक्षित ठेवण्याच्या व या उद्योगाना सर्व प्रकारच्या मंजू-या एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने राज्यातील किती जिल्हयात या योजनेचा लाभ मागासवर्गीय समाजाला मिळाला आहे व किती जिल्हृयात एक खिडकी योजना सुरु करण्यात आली आहे,

(३) असल्यास, राज्यात प्रत्येक जिल्हयात या योजनेचा लाभ मागासवर्गीय समाजाला मिळावा यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०१-२०१७)** :(१) औद्योगिक धोरण २०१३ व डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना २०१६ नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजगांसाठी असलेल्या औद्योगिक प्लॉटपैकी २० टक्के भूखंड अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवणे बाबत तसेच या उद्योगांना सर्व प्रकारच्या मंजु-या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबाबत मैत्री कक्ष सक्षम करून एक खिडकी योजना राबविण्याबाबत स्वतंत्र शासन निर्णय दि.११/०२/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने देखील या उद्योगांना महामंडळ स्तरावरील सर्व प्रकारच्या मंजु-या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वीत केली आहे.
(२) व (३) राज्यात एकूण ७८ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थीनी प्रस्तूत योजनेंतर्गत अर्ज केले आहेत.
प्रस्तुत एक खिडकी योजना राज्यस्तरीय शिखर स्तरावरची व्यवस्था आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुवर्णकार-सराफ व विवकर्मा, पांचाळ समाजाच्या कारगीर कामगारांसाठी कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(४३) ६१५०५ (२०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुवर्णकार व विवकर्मा आणि पांचाळ समाज महाराष्ट्र राज्यात संख्येने अल्प प्रमाणात असून इतर मागासवर्गीय कोट्यातून मिळणाऱ्या शैक्षणिक व नोकरी विषयक सवलती समाजाला प्राधान्याने देण्यात याव्यात, सुवर्णकार-सराफ व विवकर्मा, पांचाळ समाजाच्या कारगीर कामगारांसाठी कल्याण मंडळ स्थापना करून कल्याणकारी योजनांचा लाभ द्यावा. श्री विवकर्मा महाराज किंवा संत शीरोमणी, श्री नहरी महाराज व समाज रत्न नाना शंकर शेठ यांचा उचित सन्मान करावा, यासह विविध १३ मागण्यांचे निवेदन व प्रस्तुत लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य, इचलकरंजी यांचे पत्र मा. सामाजिक न्यायमंत्री यांना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-१२-२०१६) :** (१) होय.
(२) सदरील निवेदनात असलेल्या मागण्यांची यादी सोबत जोडली आहे.

सदरहू निवेदनातील मागण्या ह्या निरनिराळ्या विभागाशी/कार्यासनाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागांना परस्पर कार्यवाही करिता पाठविण्यात आल्या आहेत.

तसेच निवेदनातील मुद्या क्र. ३ बाबत नमुद करण्यात येते की, सुवर्णकर समाजाचा समावेश हा इतर मागास प्रवर्गात होतो त्या प्रवर्गातील लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी व त्यांच्या आणि विकास महामंडळाकडून अर्थसहाय्य करण्यता येते. त्यामुळे प्रत्येक जाती व उपजातीसाठी शासनाकडून स्वतंत्र महामंडळ स्थापन करता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुष्पकुंज गृहनिर्माण सहकारी संस्थामध्ये सचिवाने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४४) ६१५३६ (२२-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पुष्पकुंज गृहनिर्माण सहकारी संस्था, यवतमाळ. या संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या सचिवांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ यांचेकडे चौकशीसाठी अर्ज केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपनिबंधक कार्यालय, यवतमाळ यांचेमार्फत चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यात आली असून या अहवालामध्ये संस्थेच्या सचिवाने गैरव्यवहार करुन बिल काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा उपनिबंधक यवतमाळ यांनी सर्व पुरावे असताना कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबधित प्रकरणामध्ये अधिकारी गुन्हे नोंदविण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले त्यांच्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०१-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

चौकशी अहवालामध्ये अवास्तव खर्चाबाबत आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही. मात्र संस्थेचे लेखापरिक्षण होणे अद्याप बाकी आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसंतराव नाईक भटक्या विमुक्त महामंडळास निधी देण्यासह विविध मागण्यांचे निवेदन**

**(४५) ६१५८६ (२०-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक भटक्या विमुक्त महामंडळास निधी देण्यासह विविध मागण्यांचे निवेदन व स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांचे पत्र मा. सामाजिक न्यायमंत्री यांना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७) :**(१) होय.

(२) सदरील निवेदनात, गेल्या ४ वर्षात कोल्हापूर जिल्ह्याकरीता महामंडळाच्या थेट योजनेचा निधी प्राप्त झालेला नाही. या जिल्ह्यामध्ये या योजनेंतर्गत लाभ घेऊ इच्छिणारे बरेच लोक आहेत. तेव्हा राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेमार्फत मिळणाऱ्या योजनेचा निधी कमीत कमी रुपये दोन कोटी कोल्हापूर जिल्हा कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून गेल्या ४ वर्षात फक्त २ वर्षे प्राप्त झालेला निधी मागणीच्या प्रमाणात अत्यल्प असल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील लाभार्थींना कर्ज मंजूरीकरीता निधी तिवरीत करणे महामंडळास शक्य झाले नाही. चालू वर्ष २०१६-२०१७ मध्ये केंद्रीय महामंडळाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महमंडळाकरीता रु.१०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देयाचे कळविले असून सदर निधी प्राप्त झाल्यानंतर उपलब्धते नुसार आवश्यक निधी कोल्हापूर जिल्ह्यातील महामंडळामार्फत वितरीत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात सावकारी कर्जमाफी योजनेतील तरतुदींवर अंमलबजावणी करण्यात दिरंगाई होत असल्याबाबत

**(४६) ६१६७९ (२२-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात सावकारी कर्जमाफी योजनेतील तरतुदींवर अंमलबजावणी करण्यात दिरंगाई होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकारी कायद्याचे उल्लंघन होत असल्यामुळे सदर प्रकरणाशी चौकशी करण्यासाठी विभागीय सह निबंधक अमरावती यांनी द्वी सदस्यीय समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी मध्ये काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सावकारी विषयाशी निगडीत मुद्द्यांबाबत प्राप्त निवेदने व तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासठी विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) कार्यालय, अमरावती व सहकारी अधिकारी श्रेणी-२, विभागीय सहनिबंधक कार्यालय, अमरावती यांची नियुक्ती केली आहे. सदर चौकशी अहवालामध्ये खालील मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

अ) मुंबई सावकारी अधिनियम, १९४६ अन्वये दाखल करण्यात येणा-या तक्रारीवर महाराष्ट्र सावकारी नियमन (अधिनियम), २०१४ मधील कलम १८ नुसार कारवाई करणे आवश्यक आहे.
ब) अवैध सावकारीबाबतच्या तक्रारींची तालुकास्तरावरुन सुरु असलेल्या चौकशीमध्ये कायद्याच्या कलम १६ नुसार अभिलेखांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.
क) कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केलेल्या सावकारांविरुध्द कार्यवाही करणे आवश्यक आहे.
(४) उपरोक्त मुद्दा क्र. अ मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा उपनिबंधक, अकोला यांचेकडे प्राप्त झालेल्या ७ तक्रारअर्जापैकी ६ तक्रारअर्जावर अधिनियमाच्या कलम १८ नुसार सुनावणी सुरु आहे. एक प्रकरण निकाली निघाले असून एका प्रकरणी अवैध सावकारी सिध्द झाली असल्याने संबंधीत सावकाराने ताब्यात घेतलेली तक्रारदाराची मालमत्ता त्यास परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मुद्दा क्र. ब मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा उपनिबंधक, अकोला यांचेकडे प्राप्त झालेल्या १८ तक्रार अर्जावर अधिनियमाच्या कलम १६ नुसार सुनावणी सुरु आहे.

मुद्दा क्र. क नुसार परवानाधारक सावकाराने त्याच्या कार्यक्षेत्राबाहेर व्यवसाय केला असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

---

## वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाने आता लाभार्थ्यांना कर्जवाटप करणेही कमी केले असल्याबाबत

**(४७) ६२१७२ (२०-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाने आता लाभार्थ्यांना कर्जवाटप करणेही कमी करत मागील आर्थिक वर्षात केवळ ३३६ लाभार्थ्यांनाच कर्जवाटप केले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या महामंडळाला आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊन अधिकाअधिक लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी कर्जवाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१७)** :(१) नाही. सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध झालेल्या रु.८८२.०० लाख तरतुदीतून एकूण १४१२ इतक्या लाभार्थ्यांना कर्जाचे वाटप करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आकोला जिल्ह्यात परवाना धारक सावकारांनी लेखी हीशेब न ठेवलेबाबत**

**(४८) ६२८८९ (२२-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात परवाना धारक सावकारांकडून शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाच्या नोंदीसाठी खाते पुस्तिका ठेवणे, रोकड व खाते वही ठेवणे, कर्जदारास विवरणपत्र देणे ई. बाबी कायद्याने बंधनकारक असताना त्याची पायमल्ली झाल्याची अनेक प्रकरणे मागील २ वर्षात समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानाधारक सावकारांनी हीशेब व लेखाजोखा ठेवण्याचा नियम न पाळल्याची किती प्रकरणे उघड झाली,

(३) असल्यास, सावकार कायदा कलम २५ नुसार दरवर्षी ३१ मार्चला हिशेबाचे विवरण सादर करण्याचा दंडक असताना अशी विहित विवरण पत्रे सादर न केलेल्या सावकारांना परवाना नुतनीकरण करून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अनुषंगाने गतवर्षी २०१५-२०१६ १७१७ कोटी रुपयाची शासनाने सावकारी कर्ज माफी केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सावकारी कर्ज माफी देतांना शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज सावकारी कार्यक्षेत्रा बाहेरील असल्याच्यासबबी खाली शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती नाकारण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीत काय आढळून आले,

(७) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करणार आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) याबाबतची बाब अकोला जिल्ह्यात निदर्शनास आलेली नाही.

(३) याबाबतची बाब अकोला जिल्ह्यात निदर्शनास आलेली नाही.

(४) विदर्भ व मराठवाड्यातील शेतक-यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय क्र.एमएलए-१०१५/प्र.क्र.२५/७-स, दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयान्वये रु.१७१.३० कोटींची तरतूद कर्जमाफीसाठी करण्यात आली. त्यापैकी कर्जमाफीसाठी रु.६१२०.८३ पर्यंत जिल्हास्तरीय समितीमार्फत खर्च करण्यात आली.

(५) शासन निर्णय क्र.एमएलए-१०१५/प्र.क्र.२५/७ स, दिनांक १० एप्रिल, २०१५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या लाभार्थींच्या पात्रतेच्या निकषाची पूर्तता करणा-या कर्जबाजारी शेतक-यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यात ४९ पात्र शेतक-यांना रु.३.९६ लाख रकमेचा लाभ देण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

**भंडारा जिल्ह्यात भेल उद्योग प्रकल्पाचे निर्मितीबाबत**

**(४९) ६३५१७ (२२-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील मुंडीपार येथे भेल प्रकल्पाकरिता भूसंपादन करून दिनांक १३ मे, २०१३ रोजी वा त्या दरम्यान तत्कालीन केंद्रीय मंत्री व मुख्यमंत्री यांच्या हस्ते सौर उर्जा व फेब्रिकेषण प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या प्रकल्पातून भंडारा जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन व पर्यावरण विभागाने हा प्रकल्प इको सेन्सिटीव्ह झोन येत असल्याने काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,वन व पर्यावरण मंत्रालयाने भेल प्रकल्प इको सेन्सिटीव झोन मधून हटविण्याचा निर्णय घेतला,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रकल्प केव्हा पूर्ण होणार,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०१-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही,

संबंधित उद्योग हा केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत घोषित पश्चिम घाट इको सेन्सिटीव्ह झोन या क्षेत्रात मोडत नाही. तथापि, भेल प्रकल्पाच्या विनंतीनुसार नवेगाव - नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या इको सेन्सिटीव्ह झोनमधून बामणी, खैरी व मुडीपार ही गावे वगळण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. केंद्र शासनाने दि. २५.०२.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा इको सेन्सिटीव्ह झोन म्हणून अंतिमरित्या अधिसूचनेनुसार भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील बामणी, खैरी ही गावे वगळण्यात आली असल्याचे दिसून येते. तथापि, मुंडिपार (सिंदीपार) हे गाव समाविष्ट असल्याचे दिसून येते.

(५) सदर प्रकल्पाकरीता १९२ हेक्टर जागेची आवश्यकात आहे. त्यापैकी १८७ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली असून, सदर जागेवर कार्यालयीन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित शासन जमीन अधिग्रहणाची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

उपरोक्त उद्योग घटकाकडून प्राप्त माहितीनुसार फॅब्रीकेशन प्लॅन्ट प्रकल्पाच्या अनुषंगाने काम सुरु करण्यात आलेले नसून, बाजाराची स्थिती व मागणीमध्ये सुधारणा झाल्यास प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे. तसेच सोलर प्लॅन्ट प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून ४० टक्के कॅपीटल सबसीडी मंजूर झाल्यानंतर तसेच इतर आवश्यक परवाने प्राप्त झाल्यानंतर बाजाराची स्थिती विचारात घेऊन उद्योग घटक उत्पादनात जाणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अवैध सावकारांवर कारवाई करुन पीडीत शेतकऱ्यांना शेतजमिन परत करण्याबाबत**

**(५०) ६३६५९ (२२-०८-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावकारी पैशासाठी शेतक-यांच्या शेताची खरेदी करुन घेतलेल्या अवैध सावकारांवर कारवाई करुन पीडीताना शेतजमिन परत करण्यासाठी शासन निर्णय करावा अशा आशयाची तक्रार वर्धा व नागपूर जिल्ह्यातील शेतक-यांच्या वतीने श्री.यशवंत झाडे यांनी दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषी अवैध सावकारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) श्री.यशवंत झाडे यांच्या तक्रारीमधील एकूण १५ प्रकरणांपैकी ८ प्रकरणे समुद्रपूर तालुक्यातील असून या सर्व प्रकरणात विनापरवाना सावकारी व्यवहारासंदर्भात केलेल्या चौकशीमध्ये कोणीही दोषी आढळले नसल्याने संबंधीतांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. उर्वरित ७ प्रकरणे हिंगणघाट तालुक्यातील असून या सर्व प्रकरणात कोणीही दोषी नसल्याचा अहवाल सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, हिंगणघाट यांनी सादर केला आहे. मात्र या ७ प्रकरणांपैकी ६ प्रकरणांत सावकारी व्यवहारात कर्ज देणारी एकच व्यक्ती असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच या प्रकरणांची चौकशी योग्यरित्या न झाल्याचे निदर्शनास आल्याने ही ६ प्रकरणे फेरचौकशीकरीता दिलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.